# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभेचे  इतिवृत्तांत

दिनांक ११-०२-२०१०

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## ११/०२/२०१० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२४) इतिवृत्त

(दि.१०/२/२०१० रोजीची तहकूब सभा)

दि.१०/०२/२०१० रोजी तहकूब करण्यात आलेली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा दि.११/०२/२०१० रोजी **मा.सभापती श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे दुपारी ५.४७ वाजता 'वंदे मातरम्' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त डॉ.पुरूषोत्तम भापकर, भा.प्र.से., नगर सचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.

०१. श्री. कटकटे सतीश विश्वनाथ
०२. रविकांत काशीनाथ गवळी
०३. श्री.जावेद हसन खान
०४. श्री. सुरे सिताराम इसराम
०५. श्री. देसरडा प्रशांत सुभाष
०६. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
०७. श्री. घडमोडे भगवान देवीदास
०८. श्री. पांडे विनायक प्रभाकर
०९. श्री. दामोधर शिंदे
१०. श्रीमती मेहरून्नीसा खान
११. श्री.सोनवणे कचरू श्रीपत
१२. सौ. मोमीन सफिया फिरदौस

संवाद :

श्रीमती मेहरून्नीसा खान :सभेला अधिकारी उपस्थित नाही त्यांना बोलवून घ्यावे तोपर्यत सभा घेवू नये.

श्री.रविकांत गवळी :कर्मचारी यांना निवडणूकीचे कामे दिली ते काम करून कार्यालयीन काम किती वेळ करणार आहे खुलासा करावा

कर निर्धारक व संकलक: औरंगाबाद महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीकरीता निवडणुक आयोगाच्या आदेशानुसार मतदार यादया तयार करण्यासाठी महापालिकेचे २७५ अधिकारी /कर्मचारी यांना नेमण्यात आलेले आहे. ३ उपआयुक्त हे प्राधिकृत अधिकारी त्यांचे मदतीला सहाय्यक प्राधिकृत अधिकारी म्हणून उपअभियंते व.अधिकारी त्यांचे अधिनस्त पर्यवेक्षक व प्रगणक या प्रमाणे कर्मचारी नेमले. त्या कर्मचाऱ्यांना विभागातील त्यांचे काम सांभाळून

निवडणूकीची कामे करावी असे आदेशात म्हटले आहे. निवडणुकीचे काम प्रायोरेटीवर करायचे आहे. निवडणुक आयोगाने जो कार्यक्रम दिला त्यानुसार निवडणुकीच्या मतदार याद्या तयार करणे आहे.

| | |
|---|---|
| श्री.रविकांत गवळी | :निवडणूकीचे काम दिले दुमत नाही. ८-१५ दिवसानंतर आचारसंहित लागेल वार्डातील अनेक कामे करणे बाकी आहे ५-२-२ मधील कामे थांबविले शिल्लक काळात कोण काम करणार आहे. |
| श्री.रविकांत गवळी | :अभय योजने अंतर्गत प्रशासनाने ५ दिवस वाढवून दिले त्यात ३ दिवस सुटटी आलेली आहे |
| मा.सभापती | :सुटटीचे कार्यालय चालू राहणार असून कुठल्याही कामावर परीणाम होणार नाही. |
| श्री.रविकांत गवळी | :तसे जनतेला आवाहन करावे. |
| श्री.नारायण कुचे | :दिं. २५-०२-२०१० पर्यंत मुदतवाढ दयावी. |
| श्री.भगवान घडमोडे | :या योजनेची जणजागृती चांगली झाली प्रतिसाद मिळातो यापेक्षा जास्त प्रतिसाद मिळत असेल तर आणखी मुदतवाढ दयावी. |
| मा.सभापती | :अभय योजनेसाठी चांगला प्रतिसाद मिळत असेल तर आणखी मुदतवाढ देण्याचा प्रशासनाने विचार करावा सर्व अधिकार मा.आयुक्तांना देत आहोत. |
| श्री.सतीष कटकटे | :या बाबतीत प्रशासनाचा खुलासा घेण्यात यावा. |
| मा.आयुक्त | :वसुलीच्या बाबतीत अडचणी येत होत्या अनधिकृत नळ कनेक्शन होते म्हणून सर्वांनी एक मत करून जे अनधिक्रृत नळ कनेक्शन रेग्यूलाईज करण्या संदर्भात अभय योजना राबविली पाहिजे.पुर्वी ज्या प्रमाणे ही योजना जाहिर केली होती सर्वसाधारण सभेत या संदर्भात चर्चा झाली. अर्धा इंची नळ कनेक्शन असेल तर रू.१००० दंड व ३०६० रू भरणा करून घ्यावे पाऊन इंच असेल तर २०००रू दंड व पुढील इंचचा आकार व व्यावसायिक असेल तर त्याप्रमाणे रेट ठरविले.सर्व प्लंबर, मजूर, लाईनमन, दुय्यम आवेक्षक, जे.ई, उपअभियंता, कार्य.अभियंता यांची डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंन्टरमध्ये संयुक्त बैठक घेतली. सर्व मिळून २०० लोक हजर होते. ही स्कीम अनेकांना माहितच नव्हती हे काम करतांना प्रत्येकाची भुमिका काय असावी योजना काय व प्रत्येकाने काय करायला पाहिजे समजून सांगितले.आतापर्यंत असेच चालत आले की मी पाणी सोडणार जे पाणी येईल ते येईल. सर्वांची हीच ओरड होती टाकी भरत नाही.पाणी कमी येते या बाबत मागिल बैठकीत चर्चाही ज्ञाली होती.या २-४ दिवसात असे समजले की या योजनेला चांगला प्रतिसाद मिळतो आहे.काल अनेक ठिकाणी लोकांच्या रांगा होत्या असे होवू नये की त्यांना फॉर्म मिळाले नाही.नागरीकांना योजना समजण्यास वेळ लागू शकतो आणखी मुदत वाढवून देण्यास हरकत नाही असे वाटल्यावरून ५ दिवसाची कमी मुदत देत असून त्यावर ठाम राहत आहोत काल ६३० नळ कनेक्शन एका दिवसात अधिकृत झाले.५ ते १० या तारखेत १५६३ नळ कनेक्शन अधिकृत केले तर ८५२ कट केले. |

श्री.प्रशांत देसरडा :ठराविक वार्डातच ही योजना राबविली जात आहे. जेथे वसूली होते तेथेच हे होते जेथे वसुली होत नाही तेथे कुणीही गेले नाही.वार्ड वाईज माहिती धेवून कार्यवाही करावी.

मा.आयुक्त : काही वसाहतीमध्ये लोकांनी पाणीपटटीच भरणा केली नाही १०,१५,२० लक्ष पर्यत रक्कम आहे अशा वसाहतीचे नावासह पेपरला जाहिर प्रगटन देवून नळपटटी भरणा करावी नसता कनेक्शन कट केले जाईल असे सुचविले.स.सदस्य बोलतात ते सत्य आहे या योजने बाबत काही लोकांना माहिती नव्हती परवाच्या बैठकीच्या माध्यमातून या योजनेच्या संदर्भात मॅसेज खालच्या लोकापर्यत सर्वांना पोहचला आहे.१५ तारखेनंतर ज्यांनी कुणी अनधिकृत नळ कनेक्श्न घेतले त्यांना तसेच महापालिकेचे त्या भागासाठी असलेले संबधीत कर्मचारी यांना सुध्दा जबाबदारी होती म्हणून कार्यवाही केली जाईल.पुढील ३ दिवस सार्वजनिक सुटटी असेल तरी पुर्ण यंत्रणा या योजनेसाठीचे काम करणार आहे.

श्री.विनायक पांडे : अनेक प्लंबर अनधिकृत नळ कनेक्शन देतात त्यांचेवर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करावे.पहाडसिंगपूरा येथे जेसीबीच्या मदतीने अनधिकृत नळ कनेक्शन तोडतांना मुख्य लाईन फुटली दोन दिवस त्या भागात पाणी मिळाले नाही अशी ३१ जानेवारी पाणी पुरवठ्या संदर्भात मुदत दिली काहीही फायदा झाला नाही.याकडेही लक्ष दयावे.

श्री.सतीष कटकटे :बाबा पेट्रोल पंप ते चिकलठाणा पर्यतच्या रस्त्यावर अनधिकृत नळ कनेक्शन असून ते लोक अभय योजने अंतर्गत का महापालिकेकडे येत नाही.२४ तास पाणी चालू असते.या योजनेत सहभागी होत नसेल तर प्रशासनाने काय कार्यवाही केली.

श्री.सिताराम सुरे :पुढील ३ दिवस सुट्टी असून बँका बंद असतील त्यासाठी नागरीकांची तांराबळ होवू शकते करीता २५ तारखेपर्यत अभय योजनेची मुदत वाढवावी.

श्री.रविकांत गवळी :मुदत वाढविली तर लोक पुढे येणार नाही.जी मुदत दिली त्या काळापर्यतची नागरीकामध्ये जनजागृती करावी.

मा.आयुक्त :बैठक घेतली त्यात १६ प्लंबर हजर होते. श्री.अब्दुल सलीम हे गेल्या ३२ वर्षापासून काम करतात आतापर्यंत त्यांनी ३५०० कनेक्शन दिले. त्यांना तंबी देण्यात आली. ४ महिण्यापासून ते ३२ वर्ष सेवा करणारा प्लँबर यात असून त्यांना उद्यापर्यत त्यांनी कुणाला कनेक्शन दिले यादी मागविली आहे.ती यादी महापालिकेच्या कर्मचा-यांनी व्हेरीफाय करून अमुक भागात इतके कनेक्शन असल्याचे सर्टीफाय केले पाहिजे.

श्रीमती मोमीन सफिया :गुंठेवारी भागातील रहिवाशांना अभय योजनाच्या माध्यमातून सवलत देवून नळ कनेक्शन रेग्यूलाईज करावे.या भागात कॅम्प लावावे.

श्री.सतीश कटकटे :बाबा पेट्रोल पंप ते चिकलठाणा पर्यत मोठमोठया हॉटेल व इतर कर्मशियल इलिगल नळ कनेक्शन २४ तास पाणी येते ते लोक अभय योजने अंतर्गत रेग्यूलाईज करण्यासाठी का येत नाही.त्या हॉटेलचे नाव सुध्दा देवू शकतो.

कार्य.अभियंता-अ व ड : अमुक एक नाव समजले तर कार्यवाही करता येईल. बाबा पेट्रोलपंप ते क्रांतीचौक पर्यतच्या रस्त्यावर २४ तास चालू असणारी जलवाहिनी नाही.

| | |
|---|---|
| श्री.प्रशांत देसरडा | : मा.सभापती यांनी शहरातील कर्मशियल नळ कनेक्शन लिगल इलिगल किती या बाबत ३०-४० हजार रक्कम खर्च करून सर्वे केला माहिती मिळवली सर्वसाधारण सभेपूढे ठेवली जे प्रश्न उपस्थित झाले ते सर्व त्यात होते.त्यावेळी निर्णय घेतला झोनवाईज करून कार्यवाही करावी परंतु ते काम कुणी करायचे असा प्रश्न प्रशासनासमोर पडतो. इलिगल कनेक्शन शोध घेण्याचे काम प्रशासनाचे आहे.स.सदस्यांना हॉटेलचे नाव सांगण्याची वेळ येते हे बरोबर नाही. ही माहिती ३ वर्षापुर्वी दिलेली आहे एका वेळेस ८००-१००० नळ कनेक्शन अधिकृत होवू शकतात ३ वर्षात दिलेल्या माहिती पैकी ३० टक्केच नळ रेग्यूलाईज केले असते तरी मोठे उत्पन्न आले असते व निवासी लोकांना ५००रू नळ कनेक्शन देवू शकलो असतो. दिलेला रेकॉर्ड आजही धुळखात पडून आहे. तो रेकॉर्ड कुठे आहे प्रशासनाने खुलासा करावा. |
| मा.सभापती | : या संदर्भात मा.आयुक्तांशी चर्चा करून योग्य निर्णय या बाबतीत घेतला जाईल. |
| श्री.प्रशांत देसरडा | :अभय योजने अंतर्गत प्रशासन चांगले काम करीत आहे.मुदत वाढवून द्यायची की नाही ठरवावे. |
| मा.सभापती | : ६३० नळ कनेक्शन लिगल केले त्यात कर्मशियल किती त्यातून उत्पन्न किती मिळाले माहिती दयावी. |
| श्रीमती मेहरून्नीसा खान | :कर्मशियल लिगल इलिगल नळ कनेक्शनचा शोध घ्यावा मुख्य जलवाहिनीवर आहे २४ तास पाणी घेतात त्यांचेकडून अगोदर वसूली करावी इतर वसुलीवर जास्त भर देण्याची गरज पडणार नाही. |
| कार्य.अभियंता-ब व क | :या गाबत निश्चित माहिती आता नाही एकूण १०००-११०० व्यावसायीक नळ कनेक्शन असतील |
| मा.सभापती | : मी अहवाल दिला त्याप्रमाणे परमीटरूम, बीअरबार, देशी दारूचीदुकाने,हॉस्पीटल,लॉजींग-बोंर्डीग,खानावळ,कमर्शीयल बँका असे सर्व मिळून २२ हजार संख्या आहे.महापालिकेच्या रेकॉर्डनुसार १० टक्केच येते. २२ हजार पैकी १० हजार कर्मशिलय नळ कनेक्शन लिगल केले तर महापालिको जवळपास ६० कोटी दर वर्षी महसूल मिळू शकतो.बाबा पेट्रोल पंप ते विमानतळ ते हर्सुल पर्यत जवळपास ५-७ हजार कर्मशियल नळ कनेक्शन असतील त्याचा प्रशासनाने शोध घ्यावा महापालिकेला उत्पन्न मिळाण्याच्या दृष्टीने कार्यवाही आवश्यक ती कार्यवाही करावी. |
| श्री.प्रशांत देसरडा | :स्वाईन फ्ल्यूमूळे अनेकाचा मृत्यू झाला या प्रमाणेच महापालिकेचे कर्मचारी श्री.मोहन गवळी यांचा मृत्यू झाला त्यांचे कुटूंबाची अवस्था वाईट आहे.सेवा बजावत असतांना मृत्यू झाला तर कर्मचा-यांच्या कुटूंबातील नातेवाईक यांना विविध योजने अंतर्गत ४-५ लक्ष रक्कम ही दरवर्षी ५०-५० हजार या प्रमाणे काढता येत असे व त्यातून ते कुटूंब त्यांचा खर्च भागत असे.गेल्या काही दिवसात एकूण ८ कर्मचा-याचे निधन झाले अशा पदावर काम करणारे कर्मचारी यांचे साधारण कुटूंब असते.पॉलीसीत बदल केल्यामूळे या मृत व्यक्तीच्या कुटूंबातील नातेवाईकाना एक ही पैसा मिळाला नाही मिळत नाही.अशा कर्मचा-याच्या जागेवर नोकरी देणे किंवा त्यास स्वतःच्या पायावर |

उभा करून शकत नसेल तर त्या कुटूंबाचा प्रपंच उध्दस्त करण्याचा अधिकार कुणालाही नाही.वृत्तपत्रात वाचण्यात आले की महापालिकेकडे कामगार कल्याण निधी सुध्दा शिल्लक आहे.पॉलीसीत बदल करायचे व त्यानुसार जर अशा कर्मचा-याच्या कुटूंबाना पैसे मिळत नसेल तर मदत कशी करायची या बाबत पर्याय काय याचा अभ्यास करण्याची वेळ सदस्यांना, पत्रकारांना आली दुर्दैव आहे. पॉलीसी बदलली का हा प्रश्न असून कुणी जर स्वत:चे हित साधत टारगेट पूर्ण करत असेल व सहया न घेता परस्पर पॉलीसी बदलणे ८-१० कर्मचाऱ्याचे कुटूंबाना रस्त्यावर आणणे कितपत योग्य वाटते.या संदर्भात अनेक वेळा सभागृहात चर्चा झाली परंतु या बाबतीत प्रशासनाने विचार केलेला नाही.या कर्मचा-याचे कुटूंब कार्यालयात चकरा मारतात.माहिती घेतली असता पॉलीसी चेंज केली म्हणून सध्या तरी या कुटूंबांना पैसे मिळू शकत नाही असे कळले.या बाबत मा.आयुक्तांनी जातीने लक्ष दयावे व कामगार कल्याण निधी मध्ये शिल्लक असलेल्या रक्कमेतून या कुटूंबीयांना मदत करावी. या पॉसीलीच्या संदर्भात अहवाल पूढील सभेत ठेवण्याचे पॉलीसी तसेच पुर्वीप्रमाणेच पॉलीसी चालविण्याचे प्रशासनाला आदेशीत करावे चालत असलेल्या पॉलीसीच्या प्रमाणे देण्याची कार्यवाही करावी.

श्रीमती मोमीन सोफिया :५-२-२ नुसार विकास कामे करण्या बाबत चर्चा झाली होती काय निर्णय घेतलेला आहे खुलासा करावा.

श्री.भगवान घडमोडे :राजेंद्रसिंग अजीतसींग यांना ब्लॅकलिस्ट मध्ये समाविष्ट करावे म्हणून निर्णय घेतला होता.एजन्सीने निविदा भरल्या परंतु सदर एजन्सी चांगले काम करीत नाही असे संचिकेमध्ये स्पष्ट लिहिले किती कामाच्या संचिकेवर असे लिहिले आहे.त्यांना त्वरीत ब्लॅकलिस्ट करावे तोपर्यत सभा होवू देणार नाही.

मा.सभापती :सदर प्रकरणाची संचिका ताबडतोब सभागृहात मागवून खुलासा देण्यात यावा.

श्रीमती मेहरून्नीसा खान :लोकसभा,विधानसभेच्या आचारसंहितेमध्ये ४ महिणे गेले बजेट बुक फायनल होईपर्यत ४ महिणे लागले पुर्ण विकास कामे या वर्षात होणार नाही त्यासाठी ५-२-२ नुसार विकास कामे करावी.

मा.आयुक्त :माझेपर्यत ब्लॅकलिस्ट करण्या संदर्भात संचिका आली असेल तर उदयाच या बाबतीत निर्णय घेतला जाईल.

मुख्यलेखाधिकारी :श्री.राजेंद्रसिंग अजीतसींग सर्वच वार्डात कामे करतात २-३ महिण्यात एजन्सी फिक्सींगच्या ब-याच संचिका या विभागाकडे आल्या वार्ड ई व फ मध्ये या एजन्सीची जास्त कामे असून ३०-३५ टक्के बिलोने कामे घेतली या संचिकेत कार्य.अभियंता ई व फ यांनी मागिल कामाची प्रत बघता या एजन्सीचे काम चांगले नाही.असे म्हटले व दुस-या क्रमांकचे एजन्सीला काम देण्याची शिफारस अनेक संचिकेत केली इतर वार्ड कार्यालयातील या एजन्सीने अनेक कामे लोयस्ट मध्ये घेतली असतांना ती त्यांना दिली गेली वार्ड ई व फ मधील कामाच्या बाबतीत अशी शिफारस का झाली ही जी

विसंगती आहे त्या बाबत कार्य.अभियंता यांचा खुलासा घेवून त्यानंतर निर्णय घेणे योग्य राहिले असे संचिकेमध्ये स्पष्ट दिले

मा.सभापती :मा.आयुक्तांनी या बाबत जबाबदारी घेतली आहे संचिका आल्याबरोबर लगेच निर्णय घेतील.

श्री.भगवान घडमोडे :या ऐजन्सीने अनेक कामे घेतली ६-८ महिण्यापासून काम करीत नाही.

श्री.सतीष कटकटे :कार्य.अभियंता यांची या एजन्सीच्या बाबतीत अहवाल दिला आहे.काही ठिकाणी कामे चालू आहे काही ठिकाणीची कामे ही एजन्सी का करीत नाही.

श्री.प्रशांत देसरडा :या एजन्सीच्या संदर्भात अनेकदा चर्चा झाली.२५-३२ टक्के बिलोने शहरात डांबरीकरणाची कामे होत आहे कोणतेही काम बघीतले तर त्याची प्रत चांगली नसल्याचे दिसून येईल.ब्लॅकलिस्टची कार्यवाही होत नाही दबाव आला असेल या एजन्सीने १५०-२०० कामे ३०-३५ टक्के बिलोने घेवुन बुकींग केले.बजेटनुसार किती कामाची बुंकीग झाली तसेच ई-टेंडरमध्ये किती निविदा झाल्या आजपर्यत किती कामे अस्तित्वात आहे याची माहिती घेतली तर वेगळे चित्र समोर दिलेस अनेक कामाचे टेंडर झाले जास्त बिलोने कामे घेतल्याने ते ठेकेदार काम करण्यास तयार नाही प्रशासन कमी पडते. ज्या संचिका टेंडरसाठी मंजूर झाल्या त्याची यादी तयार करून कार्यवाही करावी.१० लक्ष रक्कमेच्या आतील कामाची यादी सर्व कार्य.अभियंता यांनी मा.सभापती स्थायी समिती यांचेकडे देणे आवश्यक आहे..

मा.सभापती :१० लक्षचे आतील झालेल्या कामाची यादी स्थायी समितीकडे पाठविली का?

कार्य.अभियंता-अ व ड :तशी यादी स्थायी समितीकडे पाठविली नाही पाठविणे आवश्यक आहे.

श्री.प्रशांत देसरडा : डांबरीकरणाची कामे ही सर्व झालेली आहे. ती योग्य आहे का, कार्यकारी अभियंता यांनी भेट द्यावी.

मा.सभापती गेल्या २२ महिण्यात डाबरीकरणाची किती कामे व त्यावर झालेला खर्च किती आणखी क्नि्नी कामे प्रस्तावित आहे.

मुख्यलेखधिकारी :केवळ डांबरीकणावर किती खर्च झाला लगेच माहिती देता येणार नाही. पुढील सभेत माहिती दिली जाईल.

श्री.रविंकात गवळी :डाबरीकरणावर व विविध कामासाठी बजेटमध्ये तरतूद असते. एक संचिका एका टेंबलवर १५-१५ दिवस असते.स.सदस्यांना पाठपुरावा करावा लागतो मान्यता दिल्यानंतर ई टेंडरीग मध्ये निविदा जाते.निविदा काढल्यानंतर संबधीतास २ टक्के रक्कम भरण्यास कळविले जाते २-३ वर्क ऑर्डर होते लगेच काम सुरू होत नाही.

मा.सभापती :औरंगाबाद टाईम्स कॉलनीतील पुलाचे कामाची निविदा होवून २० महिणे झाले काम का सुरू झाले नाही.

श्री.रविकांत गवळी :२ टक्के रक्कम भरणा केल्यानंतर २-३ महिण्याने वर्क ऑर्डर दिली जाते त्यानंतरही काम सुरू होत नाही.पुन्हा मुदतवाढ मागतात.वेळेत कामे झाली नाही तर स्पील ओव्हर मध्ये कामे जातात.पुढील वर्षाच्या बजेटमध्ये जाते.पर्यायाने त्या वेळेस ते काम करण्याचा जास्त खर्च लागतो

मा.सभापती :मा.आयुक्तांनी याकडे जातीने लक्ष दयावे. वेळेत कामे व्हावी. कटकट गेट, काला दरवाजा, येथील रस्ते गेल्या २ वर्षापासून बंद आहे काम अद्याप का झाले नाही.

श्री.प्रशांत देसरडा :मागिल बील पेडींग असल्याने ठेकेदार कामे करीत नाही. बिलाचा व काम घेतल्याचा काही संबध नाही जे काम घेतले ते त्या ठेकेदाराने सुरू केले पाहिजे तसे परीपत्रक काढून पेडींग असलेली कामे सुरू करण्याच्या सुचना देण्यात याव्यात.

मा.सभापती :ई-टेंडरींग चे काम काम बंद आहे पुढील सभेत माहिती सादर करावी.

श्रीमती मोमीन सफिया : दिं.१९,२०,२१ फेब्रुवारी २०१० रोजी सोनेरी महल मध्ये उर्दु के आंगण मे हा कार्यक्रम घेणार असून महाठवाडा व इतर भागातील नागरीक येणार आहे.त्या ठिकाणी महापालिकेच्या वतीने सर्व सोयी सुविधा , पाणी ई. व्यवस्था करण्यात यावी शहरातील जेवढेही कब्रस्तान असतील तेथे वॉचमन देण्याची गरज आहे.या बाबत कार्यवाही व्हावी.

मा.सभापती :५-२-२ च्या बाबतीत जो ठराव घेतला त्याबाबत प्रशासन माहिती देईल.

श्री.रविकांत गवळी . सेन्ट्रल जेल ते स्मृतिवन उदयान पर्यतच्या कामाची तरतूद प्रशासनाने अर्थसंकल्पात केली होती.आज अंदाजपत्रक येते.निविदा इतर प्रोसेससाठी २१ दिवसाचा कालावधी आवश्यक आहे.त्यानंतर आचारसंहिता लागू शकते हे काम येण्यास उशीर का झाला.५-२-२ नुसार किंवा इतर कामे ताबडतोब होणार का ?

मा.सभापती :काही कामासाठी उशीर होत असेल परंतु २० लक्ष रूपये तातडीने एका प्रोग्रामसाठी देण्यात आले.त्याचा विचार करावा.मा.आयुक्तांना तातडीची कामे करण्याचे अधिकार दिलेले आहे.

श्री.रविकांत गवळी : नगररचना विभागाच्या संदर्भात विषय आहे. रेल्वे प्रशासनाची अशोक लेआऊट मधील जागा महापालिकेने भुसंपादीत केली आर्थीक मोबदल्याची मागणी रेल्वे प्रशासनाने केली मोबदला दिला नाही म्हणून महापालिकेच्या विरोधात मा.उच्चन्यायालयात त्यांनी याचिका दाखल केली. २-३ दिवसात सुनावणी होणार आहे. ५० लक्ष रक्कम महापालिकेने दिली. सध्या महापालिकेची आर्थीक परीस्थिती चांगली नाही.जर मा.न्यायालयाने रेल्वे प्रशासनाच्या बाजूने निकाल दिल्यास उर्वरीत रू.२.२५ कोटी एवढी रक्कम रेल्वे प्रशासनाला दयावी लागणार आहे.

मा.सभापती :मा.न्यायालयाने रेल्वे प्रशासनाच्या बाजूने निकाल दिल्यास उर्वरीत रू.२.२५ कोटी देण्याची आर्थीक परीस्थिती महापालिकेची आहे का ?

श्री.भगवान घडमोडे :रोख रक्कम देण्याची महापालिकेची आर्थीक परीस्थिती नाही त्या ऐवजी FSI देण्यात यावा.

मुख्यलेखाधिकारी :भुसंपादनासाठी बजेटमध्ये १० कोटीची तरतुद आहे.खर्च आणि उत्पन्नाचा मेळ घालता खर्चाची काटकसर करीत १० कोटी पैकी ५ कोटी रूपये खर्च झालेले आहे सुधारीत अर्थसंकल्प अजून अंतीम करणे बाकी आहे. अशा प्रकारे मा.न्यायालयाचे आदेश झाल्यास निश्चिपणे तशी तरतूद उपलब्ध करून दयावी लागेल.

श्री.रविकांत गवळी :तत्कालीन आयुक्त श्री. बंड साहेब असतांना अनेक भुसंपादनाचे प्रस्ताव केले त्यात मोबदला देणे,टीडीआर,व एफएसआय असे तीन पर्याय होते.महापालिकेची आर्थीक परीस्थिती चांगली नसल्याने टीडीआर किंवा एफएसआय दयावे असे ठरले त्यानुसार रेल्वे प्रशासनास कळविले परंतु ते टीडीआर,एफएसआय घेण्यास तयार नाही रोख मोबदल्याचीच मागणी करीत आहे.तो दिला नाही म्हणून त्यांनी प्रकरणा न्यायालयात दाखल केले भुसंपादनापोटी ५० लक्ष रूपये भरणा केले. त्यानंतर महापालिकेच्या संबधीत अधिकारी यांनी उर्वरीत दयावी लागणारी रक्कम वाचविण्यासाठी तेथे टीडीआर /एफएसआय लागू करायचा म्हणून संचिका सादर केली परंतु आता तेथे लागू करता येत नाही रोख आर्थीक मोबदलाच दयावा लागणार आहे.

मा.सभापती :जालना रोडवर टीडीआर लागू करता येतो का ?

उपअभियंता (न.र.) :रेल्वे प्रशासनाने ३४६० स्क्वे.मी. जागा महापालिकेला हॅडवर्क केली.त्यापोटी त्या विभागाने कलेक्ट केल्यानुसार मोबदला रू. २.७६ कोटी आहे.त्यापैकी ५० लक्ष रेल्वे प्रशासनाला अदा केले उर्वरीत रक्कमेसाठी ते मा.न्यायालयात गेले. त्याप्रकरणी सुनावणीनंतर निर्णय येईल.

श्री.रविकांत गवळी :टीडीआर किंवा एफएसआय देवू अशी चर्चा झाली का ?त्यांना आर्थीक मोबदलाच दयावा लागणार आहे.

उपअभियंता (न.र) :टीडीआर देवू शकतो एफएसआय देता येतो का हे तपासावे लागेल

श्री.प्रशांत देसरडा :एखादया जागेच्या मोबदल्याचा जर कुणी टीडीआर किंवा एफएसआय ची मागणी करीत असेल स्वागत करावे.

मा.सभापती :या संदर्भात प्रकरण मा. उच्च न्यायालयात आहे.

श्री.प्रशांत देसरडा :मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणून दयावे की रोख आर्थीक मोबदला देण्याची स्थिती महापालिकेची नाही एफएसआय किंवा टीडीआर देवू शकतो.प्रकरण न्यायालयात तडजोड होऊ शकते.

विधी सल्लागार : ९ तारखेला सीव्हील अप्लीकेशन दाखल केले आहे त्यासंबधी नगर रचना विभागाकडून रिमार्कस आल्यानंतर मा.न्यायालयात आपले रिप्लाय दिला जाईल.

श्री.रविकांत गवळी :याचा अर्थ रू.२.२५ कोटी दयावे लागणार जर त्याऐवजी टीडीआर एफएसआय लागू करू शकतो जर एखादा व्यक्ती एफएसआय मागवून त्याचे बदल्यात जो कुणी रू.२.२५ कोटी भरणा करण्यास तयार असेल तर त्या प्रमाणे देण्यास हरकत नसावी.

मा.सभापती :सदर प्रकरण मा. उच्च न्यायालयात आहे.

श्री.रविकांत गवळी : जो एफएसआय घेईल त्या बदल्यात तो २.२५ कोटी देईल. महापालिकेला जो व्यक्ती रक्कम देईल तर देण्यास अडचण काय ?

मा.सभापती :त्या ठिकाणी टीडीआर लोड करू शकत नाही एफएसआय कोणालाही देवू शकतो एफएसआय ची किमंत जर भरायला तयार असेल ----

श्री.रविकांत गवळी :एफएसआय ची किमंत कुणी भरण्यास तयार असेल तर देण्यास हरकत नसावी.

श्री.प्रशांत देसरडा :जर कुणी रक्कम भरण्यास तयार असेल व त्यास मा. न्यायालय परवानगी देत असेल तर त्याप्रमाणे कार्यवाही करण्यास काय हरकत आहे.

श्री.रविकांत गवळी :रू. २.७६ कोटी दयायचे त्यापैकी ५० लक्ष दिले उर्वरीत २.२६ कोटी रूपये महापालिकेने भरणा करण्या ऐवजी कोणी भरणा करीत असेल तर एफएसआय मागत असेल तर देण्यात अडचण नसावी.

मा.सभापती :सदर प्रकरण मा.उच्च न्यायालयात आहे.त्या बाबतीत आपण कसा निर्णय घेवू शकतो.

श्री.रविकांत गवळी :मा.उच्च न्यायालयात प्रकरण यासाठीच आहे की संबधीत जागेचा आर्थीक मोबदल्यची मागणी करीत आहे तो आपण देण्यास तयार आहे.

मा.सभापती :रू.२.७६ कोटी रूपये मा. उच्च न्यायालयात महापालिकेला भरणा करावयाचे आहे.त्यापैकी ५० लक्ष भरणा केले उर्वरीत २.२६ कोटी भरावयाचे आहे जर एफएसआय घ्यायचा असेल तर मा.न्यायालयाचे जो निर्णय होईल त्या संबधी मा.आयुक्तांना तसे अधिकार देवू मा.आयुक्त संबधीत नगररचना विभागाचे अधिकारी व विधी सल्लागार या संबधी निर्णय घेवू शकतील.

श्री.रविकांत गवळी :मा.आयुक्त यांना अधिकार दयावे नियमात बसत असेल त्याप्रमाणे कार्यवाहीचे आदेश दयावे.

मा.सभापती :मा.उच्च न्यायालयात पार्टी गेली प्रकरण प्रंलबीत आहे आताच स.सदस्य श्री.रविकांत गवळी,श्री.प्रशांत देसरडा,श्री.सतीष कटकटे यांनी आपआपले मत मांडले या प्रकरणी विधी सल्लागार व नगररचना विभागाचे उपअभियंता यांनीही खुलासा केला.ज्या प्रकरणा विषयी चर्चा झाली ते प्रकरण सध्या मा. उच्च न्यायालय येथे प्रंलबीत आहे.विकास नियंत्रण नियमावलीनूसार रस्त्याने बांधीत जागेचा मावेजा एफ.एस.आय. स्वरूपात देता येतो. या प्रकरणात महापालिकेने रस्त्याने बाधीत जागेचे मोबदला आर्थीक स्वरूपात देण्याचे प्रस्तावीत झाले होते. या बाबत मा. उच्च न्यायालयात देखील मावेजा बाबत प्रकरण संबधीतांनी दाखल केले आहे आता महापालिकेची आर्थीकस्थिती पाहता तसेच रस्त्याने बाधीत क्षेत्राचा मावेजा एफएसआय स्वरूपात देता येत असल्याने प्रकरणी मा.उच्च न्यायालयाला अवगत करून तसेच त्याची आवश्यक परवानगी घे्वून विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतूदी विचारात घेवून संबधीतांना एफएसआय स्वरूपात मावेजा देण्यास मंजुरी देण्या बाबतचे अधिकार मा.आयुक्त, विधी सल्लागार, सहा.संचालक (न.र) यांना देण्यात येते. त्यांनी नियमानुसार विशेषतः मा. उच्च न्यायालयाच्या परवानगीनुसार या प्रकरणी कार्यवाही करावी.

श्री.सतीष कटकटे : पैठणगेट रस्ता रूंद केला श्री.राजपूत यांना जागेचा मोबदला देण्याचा प्रस्ताव आला होता ६ महिणे झाले कार्यवाही केली नाही.

उपअभियंता(न.र-१) : श्री.राजपूत यांचेशी खाजगी वाटाघाटी करून पेमेन्ट देण्याचे मंजूर झाले खरेदीखताच्या वेळी व पीआर कार्ड नावावर झाल्यानंतर काही रक्कम दयावी असे धोरण ठरविले होते पुर्ण रक्कम एकत्रित दयावी असे संबधीताचे म्हणणे

होते.मा.आयुक्त साहेबाकडे बैठक झाली त्यानुसार व्हावचर तयार करून लेखा विभागाकडे पाठविले आहे.

श्री.सतीष कटकटे :वाटाघाटी केंव्हा केली.

मा.सभापती :यापूर्वी एका जागेच्या प्रकरणात दोन वेळेस मोबदला धेण्याचे प्रकार झाले त्यामूळे खरेदीखताच्या वेळी ५० टक्के पीआर कार्ड नावावर झाल्यानंतर ५०टक्के रक्कम देणे असे धोरण ठरविले संचिका पेंडीग नाही व्हावचर झालेले आहे.

उपअभियंता(न.र.) :जेव्हा खरेदी खत होईल जागा ताब्यात घेवू तेव्हाच धनादेश दिला जाईल.

मा.सभापती जागेचा ताबा मिळत नाही तोपर्यत धनादेश देणार नाही.खाजगी वाटाघाटीने जमीन न घेता भुसंपादनाच्या माध्यमातून घेत आहोत.पीआरकार्ड महापालिकेच्या नावावर करून देण्याची जबाबदारी संबधीताची आहे.

श्री.सतीष कटकटे :रस्ता रूंदीकरणाच्या नावाखाली जागा घेतली मोबदला देत नाही. सिल्लेखाना कब्रस्तानची जागा घेतली मोबदला दिला नाही. कार्यवाही का होत नाही.

मा.सभापती :वक्फ बोर्डची जागा आहे मोबदला देण्याची गरज नाही.महापालिकेने जागा ताब्यात घेतली आहे.मोबदला देणे संबधी नियमानुसार कार्यवाही होईल.

श्री.सतीष कटकटे :देवगिरी हौसींग सोसायटीमध्ये संरक्षित भिंतीचे काम चालू केले होते अर्धवट काम का राहिले

उपअभियंता-(श्री.निकम) :येथील कुंपन भिंतीचे काम वार्ड ड कार्यालयाकडून चालू होते यात दोन सीटीएस नंबर असून एका सीटीएस नंबरवर स्थगिती आदेश आहेत.या बाबतीत सीटी सर्वे कार्यालयाकडून तेथील बॉन्ड्रीज फिक्त करावी लागेल. त्यामूळे काम करण्यास अडचण आली.

श्रीमती मोमीन सोफिया : पीरगैब साहब दर्गा जवळच्या जागेवर अतिक्रमण झाले कार्यवाही केली नाही.

वार्ड अधिकारी-ड :पीरगैब साहब दर्गा जवळील अनधिकृत बांधकाम केले होते संबधीतास बीपीएमसी ॲक्ट नुसार कलम ४७८ ची नोटीस दिलेली असून नोटीसची मुदतही संपलेली आहे. पोलीस संरक्षण घेवून सदर अतिक्रमण पाडण्याबाबत संचिका वरीष्ठाकडे सादर केली आहे.

मा.सभापती :उपआयुक्त (सिडको )यांनी या बाबतीत त्वरीत कार्यवाही करावी.

श्री. रविकांत गवळी : जेंव्हा पासून गाळे बांधले तेंव्हा पासून १५-२० वेळेस निविदा देवून गाळे कोणी घेतले नाही. कालांतराने या संदर्भात स्थायी समितीमध्ये चर्चा होवून सादीया टॉकीज जवळील गाळे भाडे तत्वावर देण्यात आले आज रोजी त्या माध्यमातून ५-६ लक्ष रूपये वसुल करण्यात आले.सन १९९० ते २००८ वसुली झाली नाही परंतु त्यानंतर या माध्यमातून ८-१० लक्ष वसुली झाली. अशाच पध्दतीने २-३ गाळे अदयाप खाली आहेत त्यात नुपूर अपार्टमेंन्ट शेजारील, कबाडीपूरा व्यापारी संकुल, येथील गाळे पुर्ण मोडकळीस आलेले आहे शटर तुटलेले आहे.तेथे कुणीही भाडेने घेवू शकत नाही असे कुणी व्यक्ती असेल तर त्यांना जे काही भाडे महापालिकाने निश्चित केलेले आहे व ज्या अटी शर्ती असेल त्याप्रमाणे देण्यास हरकत नाही. स्थायी समितीमध्ये

असे काही प्रस्ताव मंजूर केले होते की जे चॅरीटेबल ट्रस्ट असेल जसे सीटी मार्बल वर एक चॅरीटेंबल स्ट्रस्ट आहे.त्या जागेला स्थायी समितीने मान्यता दिली होती.११०० स्क्वे.फुटची जागा प्रति महा रू.२८००० प्रमाणे डी.एस.आर. प्रमाणे दिली होती एखादया ट्रस्टला एवढे भाडे आकारणे कोणत्या नियमात बसते.

मा.सभापती : आतापर्यत अनेक प्रकरणे निकाली काढले दोन प्रस्तावाची संचिका प्रशासनाने काही लिगल अडचण येवू नये म्हणून मुख्यलेखधिकारी याचेकडे अभिप्रायसाठी पाठविली आहे.

श्री.रविकांत गवळी : सादिया मार्केटचाच प्रश्न नाही. नुपूर अपार्टमेंन्ट शेजारील व्यापारी संकुल, पीया मार्केट , कबाडीपूरा असेल येथे जो कुणी भाडे तत्त्वावर मागणी करीत असेल तर महापालिकेच्या अटी शर्ती नुसार देण्यास हरकत नाही.१००० स्क्वे.फुट साठी २५ हजार रू. भाडे आकारणी होते.भाडेकरू एवढे जास्तीचे भाडे कसे देईल. मागिल वेळेस ५४(१)नुसार समिती नियुक्त केली होती की बाजूचा खाजगी व्यक्ती काय भाडे आकारतो महापालिकेच्या दुकानची स्थिती काय किती भाडे आकारू शकतो म्हणून ५४(१) नुसार समिती नियुक्त करून ते भाडे आकारावे. एका प्रकरणात ८६ हजार भाडे होते.२० वर्षापासून भाडे भरत नव्हते आता ३० हजार भाडे आकारल्याने ३-४ महिण्यापासून नियमीत भाडे भरणा करीत आहे.श्रीवरखेडीश्वरी चॅरीटेंबल ट्रस्ट असेल एखादया वार्डातील २ खोल्या १५ हजार रू.प्रमाणे भाडेवर घेणे योग्य आहे का, त्यासाठी ५४(१)नुसार समिती करून त्या जागेला काय भाडे आहे तो दर लावावा.ज्या दुकान रिकामी आहे ती जे कुणी मागणी करीत असेल त्यांना भाडेने देण्यात यावेत.

मा.सभापती : नुपूर अपार्टमेंन्ट शेजारील, सादीया मार्केट व इतर व्यापारी संकुलातील रिकामी दुकाने उपआयुक्त यांनी प्रशासकीय मान्यता घेवून त्या संबधीचे भाडे निश्चित करून कार्यवाही करावी. आता संचिका मा.मुख्यलेखधिकारी मा.आयुक्त यांचेकडे डायरेक्ट न पाठविता मा.मुख्यलेखधिकारी यांचेकडे पाठवून तपासणी होवून नंतर मा.आयुक्तांकडे डायरेक्ट पाठवावे. नियमानुसार जी कार्यवाही करता येईल ती करावी.

श्रीमती मेहरून्नीसा खान :श्री.अजीज खॉ गणी खॉ यांनी केलेले अतिक्रमण काढण्याचे तोडण्याचे आदेशीत केले होते कार्यवाही केली का ?

मा.सभापती :या संदर्भात मुख्यलेखा परीक्षक यांचेकडून चौकशी काम केले असता गुन्हा दाखल केल्याची मुळ सचिका जिन्सी पोलीस स्टेशन असल्याने दुय्यम संचिकेतील कागदपत्राची उपआयुक्त (सिडका) यांनी सर्टीफाय करून मुख्य लेखा परीक्षक यांचेकडे रिपोर्ट देतील.श्री.अजीज खॉ गणी खॉ हे माजी नगरसेवक असून त्यांचे नाव संचिकेत आहे का याचा खुलासा करावा.

उपआयुक्त(सिडको) :सदरील प्रकरणात श्री.अजीज खॉ गणी खॉ यांचे नावानेच सेक्शन ५३ नुसार नोटीसेस पुर्वीच दिलेल्या आहे.त्यांचेवरच गुन्हा दाखल केलेला आहे.

मा.सभापती :तत्कालीन आयुक्त श्री. बंड साहेब यांनी निर्देश केल्यानुसार वार्ड अधिकारी यांनी दिं.४-४-०९ रोजी संबधीतास नोटीस पाठविली होती त्या नोटीसच्या अधारे की कुणाच्या दबावाखाली येवून गुन्हा दाखल केला.

उपआयुक्त (सिडको) :नोटीस नुसार गुन्हा दाखल केला अनधिकृत बांधकाम आहे त्यानुसार उक्त अधिनियमाच्या कलम ५२ नुसार गुन्हा दाख्ल केलेला आहे.नोटीस नुसार कोणतेही कागदपत्र त्यांनी दाखल केले नाही त्यामूळे त्यांनी केलेले बांधकाम अनधिकृत आहे. त्यामूळे सेक्शन ५२ नुसार गुन्हा दाखल केला.

श्रीमती मोमीन सोफिया : डॉ.फरीना, एमबीबीएस यांनी यापूर्वी दोन वर्ष येथे सेवा केली त्यांची मुलाखत घेतली पात्र असूनही सेवेत का घेतले जात नाही.

मा.सभापती : या प्रकरणी प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**<u>विषय क्र. ३५९ :</u>**

दिनांक २२/१२/२००९ (का.प.क्र.१९) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>संवाद :</u>**

श्री.रविकांत गवळी :दि.२२-१२-०९रोजीच्या बैठकीत पाणीप्रश्न, अतिक्रमणाच्या बाबतीत तसेच विषय क्र.२७० नुसार सिडको भागात किटकनाशक,अळीनाशक फॉगींग करण्यासाठी ठराव मंजूर केला त्यानुसार कार्यवाही होते का या मुद्यावर पुढील बैठकीत सुरूवातीलाच खुलासा घेण्यात यावा.

मा.सभापती :आताच सुचना केल्याप्रमाणे पुढील बैठकीत सर्व माहिती प्रशासनाने सादर करावी.

श्री.रविकांत गवळी :विषय क्र. २६४ मध्ये कायमस्वरूपी कर्मचा-यांना ५ टक्के महागाई भत्ता वाढवून दिला हरकत नाही परंतु दैनिक वेतनावर वर्ग -३, वर्ग -४ चे कर्मचारी अनेक वर्षापासून सेवा करतात.महागाई वाढली त्यानुसार वर्ग-३ चे कर्मचारी यांना रू.४६ व वर्ग -४ चे यांना रू.३६ ची दै. वेतनात वाढ करण्यात यावी.

मा.सभापती :शासन जीआर नुसार दै.वेतन कर्मचा-याच्या वेतनात वाढ करावी. इतिवृत्त कायम करण्यास मंजूरी देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

दिनांक २२/१२/२००९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्र. ३६० :</u>**

(दि.२९.१.१० च्या सभेतील विषय क्र. ३१७ पुढील बैठकीत ठेवण्याबाबत झालेल्या निर्णयानुसार)

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे मान्यतेनुसार उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, महानगरपालिकेच्या मालकीच्या विविध ठिकाणी असलेले हॉल भाडेपट्ट्याने देणे विनंती अर्ज प्राप्त झाल्यानुसार संबंधीताने मागणी केल्यानुसार भाडेपट्ट्याने हॉल दिल्यास मनपाच्या आर्थिक उत्पन्नात भर पडेल.

०१. मो.शहासोक्ता कॉलनी येथील खाजगी व्यक्ती श्री.एकबाल अहमद खान आलम शेर खान यांच्या मालकीच्या इमारतीचे क्षेत्रफळ ७५.५० चौ.मी. ची जागा मनपा प्राथमिक शाळा सुरू

करणेसाठी शिक्षण विभागातर्फे कळविले असुन सदर व्यक्तीला महानगरपालिकेतर्फे रू.८४/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे रू.६३४२/- प्रतिमाह भाड्याने घेणे योग्य राहील.

०२. सिडको एन-४, हनुमान मंदिरा समोरील महानगरपालिका मालकीची बारव (विहिर) बुजविलेली खुली जागा स्थानिक सेवाभावी संस्था परमार्थ महिला सांस्कृतिक मंडळ यांना दि.२.३.२००९ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त विषय क्र.४६१ अनवये झालेल्या ठरावानुसार सिडको एन-४ हनुमान मंदिरासमोरील सिडकोने २००४ मध्ये बुजविलेली बारव परमार्थ सांस्कृतिक मंडळास विनामुल्य देखरेख व संगोपनास जुलै २००६-२०१० पर्यंत देण्यात आली होती. याच सेवाभावी संस्थेस पुढील १० वर्षाकरिता सिडको प्रशासनाच्या अटी व शर्तीवर नियमानुसार विनामुल्य देण्यास व रितसर बांधकाम परवानगी घेवूनच विकास करण्यास मा.सर्वसाधारण सभेने मंजुरी दिलेली आहे.

त्याचप्रमाणे दि.१८.१०.२००९ रोजी (का.प.क्र.३१) संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त विषय क्र. ५९६ अन्वये झालेल्या ठरावानुसार संबंधीत सेवाभावी संस्थेस पुढील १० वर्षाकरीता ऐवजी पुढील ६० वर्षाकरिता देणेच्या सुधारीत प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभेने मंजुरी दिलेली आहे. तसेच दि.२६.८.२००९ रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समिती सभेचे इतिवृत्त विषय क्र.१२० अनवये परमार्थ सांस्कृतिक महिला मंडळ ही समाजकार्य करणारी संस्थ असल्यामुळे लोकोपयोगी कामासाठी सदरची जागा या मंडळास नाममात्र वार्षिक भाडे रू.१०१/- आकारणी करून देण्यास मा.स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे. परंतु ७९२ चौ.मी. क्षेत्रफळासाठी रक्कम रू.२३/- प्रति चौ.मी. प्रति माह प्रमाणे भाड्याने देणे योग्य राहील व तसेच अनामत रक्कम मासिक भाड्याच्या १२ पट आकारणे योग्य राहील, असे या समितीचे मत असून कमाल ३० वर्षापर्यंत मुदतीसाठी प्रत्येक १० वर्षानंतर नुतनीकरण व भाडेवाढ करणे योग्य राहील.

०३. सर्व्हे नं.६८ संत तुकोबा नगर एन-२ सिडको येथील महानगरपालिका मालकीचे सभागृह मराठवाडा सार्वजनिक सभेसाठी अभ्यासिका आणि वाचनालयासाठी अध्यक्ष, श्री.पद्माकर मुळे यांना १०३६.४८ चौ.मी. क्षेत्रफळासाठी रक्कम रू.१४३/- प्रती चौ.मी. प्रतिमाह प्रमाणे व मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम आकारणे योग्य राहील.

०४. मो.हर्षनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या व्यापारी संकुलातील हॉल हुमेरा सुशिक्षीत बेरोजगार सेवा सह.संस्था मर्या. यांना १७९.३५ चौ.मी. क्षेत्रफळासाठी रक्कम रू.८० प्रती चौ.मी. प्रतिमाह प्रमाणे व मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम, सेवाशुल्क कर व इतर सर्व कर आकारणे योग्य राहील.

०५. महानगरपालिकेच्या मालकीच्या सिडको एन-३ उद्यानाजवळील खुली जागा एकुण क्षेत्र २३१८.९४ चौ.मी. असून सदर जागा श्री.अशोक उजळंबकर यांनी कै.नारायणराव उजळंबकर सार्वजनिक वाचनालय या इमारतीकरीता क्षेत्र १८६.०० चौ.मी. जागा भाडेतत्वावर मिळणेसाठी विनंती अर्ज केला होता. त्या अनुषंगाने मा.आयुक्त यांचे मंजुरीनुसार उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी सिडको एन-३ येथील उद्यानाजवळील खुल्या जागेचे क्षेत्रफळ २३१८.९४ चौ.मी. प्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रू.२६/- प्रती चौ.मी. प्रतिमाह प्रमाणे भाडे ठरविले होते व तसेच संबंधीताचे विनंती अर्जानुसार १८६ चौ.मी. क्षेत्र मागणी केल्यानुसार अर्जदारास सदरील जागा रू.२६/- प्रति चौ.मी.प्रतिमाह सा.बां.विभागाने काढून दिल्यानुसार भाडे रू.४८३६/- प्रतिमाह येते. असा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर सादर केला होता. त्यानंतर मा.स्थायी समितीने मा.सर्वसाधारण सभेसमोर शिफारस केलेली होती. मा.सर्वसाधारण सभेने दि.२४/८/२००९ विषय क्र.५९९ अनवये प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे सभागृहात झालेल्या चर्चेनुसार

महानगरपालिकेचे सिडको एन-३ उद्यानाजवळील खुली जागा एकुण क्षेत्रफळ २३१८.९४ चौ.मी. पैकी श्री.अशोक उजळंबकर यांनी मागणी केल्यानुसार कै.नारायणराव उजळंबकर सार्वजनिक वाचनालय या इमारतीकरीता क्षेत्र १८६.०० चौ.मी. जागा महानगरपालिकेच्या प्रचलित अटी शर्तीनुसार ३३ वर्षासाठी महानगरपालिकेच्या संपूर्ण नियमाचे अधिन राहून देण्यास मंजुरी देण्यात येते. असा ठराव पारीत झाला होता. मा.सर्वसाधारण सभेने नाममात्र भाड्याने देणेबाबत चर्चा झाल्यानुसार दि.१६.१.२००७ रोजी मा.स्थायी समिती ठराव क्र.२०७ नुसार प्रतिमाह भाडे रू.१०००/- अनामत रक्कम रू.१२०००/- सेवा शुल्क रू.५/- प्रति चौ.मी. प्रतिमाह व अकृषिक कर रू.७.६८ प्रति वर्ष आकारून भाडेपट्ट्याने देणे योग्य राहील. या जागेवरील वास्तु महानगरपालिकेची राहणार असून अर्जदाराने इतरांच्या निधीतून बांधून देणेचे मान्य केले आहे.

०६. मो.बसैय्येनगर (सुराणानगर) येथील महानगरपालिकेचे सभागृह भाडेपट्ट्याने मिळणेबाबत श्री.प्रभात चव्हाण, अध्यक्ष, भारतीय बंजारा उन्नती मंडळ यांनी दिनांक १८.६.२००९ रोजी विनंती अर्ज दिलेला आहे. त्यानुसार संबंधीतास सदरील ठिकाणचे सभागृह भाडेपट्ट्यावर देण्यासाठी मा.आयुक्त यांची मान्यता झालेली आहे. सदरील ठिकाणच्या सभागृहाचे क्षेत्रफळ १६०.०० चौ.मी. असुन सन २००८-०९ सिध्द शिघ्र गणकानुसार रक्कम रू.८६/- प्रती चौ.मी. प्रतिमाह भाड्याने देणे योग्य राहील. तसेच अनामत रक्कम मासिक भाड्याच्या १२ पट आकारणे योग्य राहील. परंतु दिनांक १८.८.२००९ रोजी संपन्न झालेल्या (का.प.क्र.११) मा.स्थायी समिती सभेचे इतिवृत्त विषय क्र.८७ अनवये झालेल्या ठरावानुसार मो.बसैय्येनगर (सुराणानगर) येथे महानगरपालिकेच्या मालकीचे सभागृह दि.१६.१.२००७ रोजी मा.स्थायी समिती ठराव क्र.२०७ नुसार प्रतिमाह भाडे रू.१०००/- व अनामत रक्कम रू.१२०००/- व सेवाशुल्क रू.५/- प्रति चौ.मी. प्रतिमाह व अकृषीक कर रू.७.८६ प्रति वर्ष आकारून भाडेपट्ट्याने देण्यास मा.स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे.

करीता वरील प्रमाणे अ.क्र. २, ३, ४, ५ व ६ नुसार जागा भाड्याने देण्यास मान्यता झाल्यास संबंधीताकडून एक वर्षाचे आगाऊ भाडे, मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम, सेवा शुल्क रू.५/- प्रती चौ.मी. प्रतिमाह, अकृषी कर रू.७.८६ प्रति चौ.मी. प्रती वर्ष व नियमाप्रमाणे जो मालमत्ता कर आकारण्यात येईल तो अर्जदारास इमारत भाड्याच्या व्यतिरिक्त भरणा करावा लागेल.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.दामोधर शिंदे : संत तुकोबा नगर एन-२ सिडको येथील सभागृह मराठवाडा सार्वजनिक सभेसाठी अभ्यासिका आणि वाचनालयासाठी अध्यक्ष, श्री.पद्माकर मुळे प्रतिमाह रू.१०००/- भाडे व नियमाप्रमाणे अनामत आकारून भाडेपट्ट्याने देण्याबाबत दुरूस्ती करावी.

मा. सभापती : प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या मालकीच्या विविध ठिकाणी असलेले हॉल भाडेपट्ट्याने देणे विनंती अर्ज प्राप्त झाल्यानुसार संबंधीताने मागणी केल्यानुसार भाडेपट्ट्याने हॉल देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

०१. मो.शहासोक्ता कॉलनी येथील खाजगी व्यक्ती श्री.एकबाल अहमद खान आलम शेर खान यांच्या मालकीच्या इमारतीचे क्षेत्रफळ ७५.५० चौ.मी. ची जागा मनपा प्राथमिक शाळा सुरू करणेसाठी महानगरपालिकेतर्फे रू.८४/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे रू.६३४२/- प्रतिमाह भाड्याने घेण्यास मंजुरी देण्यात येते.

०२. सिडको एन-४, हनुमान मंदिरा समोरील महानगरपालिका मालकीची बारव (विहिर) बुजविलेली खुली जागा स्थानिक सेवाभावी संस्था परमार्थ महिला सांस्कृतिक मंडळ यांना ७९२ चौ.मी. क्षेत्रफळासाठी रक्कम रू.२३/- प्रति चौ.मी. प्रति माह प्रमाणे भाड्याने देण्यास तसेच अनामत रक्कम मासिक भाड्याच्या १२ पट आकारून ३० वर्षापर्यंत मुदतीसाठी प्रत्येक १० वर्षानंतर नुतनीकरण व भाडेवाढ करणे या अटीवर भाडेपट्टयाने देण्यास मंजुरी देण्यात येते.

०३. सर्व्हे नं.६८ संत तुकोबा नगर एन-२ सिडको येथील महानगरपालिका मालकीचे सभागृह मराठवाडा सार्वजनिक सभेसाठी अभ्यासिका आणि वाचनालयासाठी अध्यक्ष, श्री.पद्माकर मुळे यांना १०३६.४८ चौ.मी. क्षेत्रफळासाठी रक्कम रू.१४३/- प्रती चौ.मी. प्रतिमाह प्रमाणे व मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम आकारून भाडेपट्टयाने देण्यास मंजुरी देण्यात येते.

०४. मो.हर्षनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या व्यापारी संकुलातील हॉल हुमेरा सुशिक्षीत बेरोजगार सेवा सह.संस्था मर्या. यांना १७९.३५ चौ.मी. क्षेत्रफळासाठी रक्कम रू.८० प्रती चौ.मी. प्रतिमाह प्रमाणे व मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम, सेवाशुल्क कर व इतर सर्व कर आकारून भाडेपट्ट्याने देण्यास मंजुरी देण्यात येते.

०५. महानगरपालिकेच्या मालकीच्या सिडको एन-३ उद्यानाजवळील खुल्या जागेपैकी श्री.अशोक उजळंबकर यांनी कै.नारायणराव उजळंबकर सार्वजनिक वाचनालय या इमारतीकरीता मा.सर्वसाधारण सभेने नाममात्र भाड्याने देणेबाबत चर्चा झाल्यानुसार दि.१६.१.२००७ रोजी मा.स्थायी समिती ठराव क्र.२०७ नुसार प्रतिमाह भाडे रू.१०००/- अनामत रक्कम रू.१२०००/-, सेवा शुल्क रू.५/- प्रति चौ.मी. प्रतिमाह व अकृषिक कर रू.७.६८ प्रति वर्ष आकारून या जागेवरील वास्तु महानगरपालिकेची राहणार असून अर्जदाराने इतरांच्या निधीतून बांधून देण्याचे अटीवर भाडेपट्ट्याने देण्यास मंजुरी देण्यात येते.

०६. मो.बसैय्येनगर (सुराणानगर) येथील महानगरपालिकेचे सभागृह श्री.प्रभात चव्हाण, अध्यक्ष, भारतीय बंजारा उन्नती मंडळ यांना दिनांक १८.८.२००९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त विषय क्र.८७ आणि दि.१६.१.२००७ रोजी मा.स्थायी समिती ठराव क्र.२०७ नुसार प्रतिमाह भाडे रू.१०००/- व अनामत रक्कम रू.१२०००/- व सेवाशुल्क रू.५/- प्रति चौ.मी. प्रतिमाह व अकृषीक कर रू.७.८६ प्रति वर्ष आकारून भाडेपट्ट्याने देण्यास मंजुरी देण्यात येते.

अ.क्र. २, ३, ४, ५ व ६ नुसार जागा भाड्याने देण्यासाठी संबंधीताकडून एक वर्षाचे आगाऊ भाडे, मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम, सेवा शुल्क रू.५/- प्रती चौ.मी. प्रतिमाह, अकृषी कर रू.७.८६ प्रति चौ.मी. प्रती वर्ष व नियमाप्रमाणे जो मालमत्ता कर आकारण्यात येईल तो अर्जदारास इमारत भाड्याच्या व्यतिरिक्त भरणा करावा लागेल या अटीवर भाडेपट्ट्याने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ३६१ :</u>**

(दि.२९.१.१० च्या सभेतील विषय क्र. ३१८ पुढील बैठकीत ठेवण्याबाबत झालेल्या निर्णयानुसार)

कार्यकारी अभियंता (ई व फ), महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, मल्हार चौक विजयनगर पासून ते तिरूपती विहार पर्यंत आरसीसी गटार बांधणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१९९९८५३/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र.३७१ दिनांक २८.२.२००८ अन्वये मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली असून सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता अंतिम तारखेपर्यंत सदरील दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

१. मे.उदय इंजिनियरींग वर्क्स ५.४०% कमी दर

२. मे.एल.के.कन्स्ट्रक्शन २५.१०% जास्त दर

वरील प्राप्त निविदापत्रकांपैकी मे.उदय इंजिनियरींग वर्क्स यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.४०% कमी असे आहेत.

